# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.01.2026** **वारःसोमवार**

---

1. राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आज पंतप्रधान विकसित भारत युवा नेतृत्व संवाद कार्यक्रमात युवा पिढीशी संवाद साधणार
2. जर्मनीचे चॅन्सलर फ्रेडरिक मर्झ आजपासून 2 दिवसांच्या भारत भेटीवर
3. महाराष्ट्रात महापलिका निवडणुकीचा प्रचार शिगेला आणि
4. न्यूझीलंडविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या पहिल्या क्रिकेट सामन्यात भारताचा 4 गडी राखून विजय

**<u>राष्ट्रीय युवा दिन</u>**

आज राष्ट्रीय युवा दिन असून, स्वामी विवेकानंदांच्या आजच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी नवी दिल्लीत विकसितभारत युवा नेतृत्व संवाद 2026 या युवा परिषदेच्या समारोप सत्रात सहभागी होऊन युवा पिढीशी संवाद साधणार आहेत. कार्यक्रमात देशभरातून सुमारे तीन हजार युवक युवती तसंच आंतरराष्ट्रीय समुदायांचे युवा प्रतिनिधीं सहभागी होणार आहेत. भारताचा विकासाचा प्राधान्यक्रम आणि देश उभारणीची ध्येयं या विषयावर युवा सहभागींनी लिहिलेल्या निबंध संग्रहाचं प्रकाशनही यावेळी मोदी यांच्या हस्ते होईल. यावेळी निवडक युवा प्रतिनिधींना पंतप्रधानांसामोर त्यांच्या कल्पनांचं सादरीकरण करायची संधीही मिळणार आहे.

दरम्यान, आजच्या राष्ट्रीय युवक दिनाच्या पार्श्वभूमीवर, भारताचे अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांनी काल नवी दिल्लीत आगामी प्रजासत्ताक दिनानिमित आयोजित राष्ट्रीय छात्र सेना अर्थात एन सी सी च्या राष्ट्रीय शिबिराला भेट दिली आणि देशभरातून आलेल्या युवा छत्रांशी संवाद साधला. आजची युवा पिढी ही देशाच भविष्य निर्माण करणार असून त्यांनी अंतराळात उड्डाण करण्याच्या सवापणबरोबरच इतर क्षेत्रातील मोठी स्वप्न पूर्ण करण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करावेत अस आवाहन शुभांशु शुक्ला यांनी यावेळी उपस्थित युवकांना केल.

जर्मन चॅन्सलर

जर्मनीचे चॅन्सलर फ्रेडरिक मर्झ आजपासून 2 दिवसांच्या भारत भेटीवर येत असून, हा त्यांचा पहिलाच अधिकृत भारत दौरा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी अहमदाबाद इथ आज त्यांचं स्वागत करणार आहेत. दोन्ही नेत्यांमध्ये आज अहमदाबाद इथं व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, आणि संरक्षण क्षेत्राविषयी द्विपक्षीय चर्चा होणार आहे.

भारत-जर्मनी धोरणात्मक भागीदारीला नुकतीच 25 वर्षे पूर्ण झाली असून या भागीदारीनुसार दोन्ही देशादरम्यान झालेल्या प्रगतीचा आढावा या बैठकीत घेण्यात येईल. दोन दिवसांच्या या दौऱ्यात मर्झ गुजरातमधल्या साबरमती आश्रमालाही भेट देणार असून अडालज या पुरातन कालीन बारव विहिरीला भेट देणार आहेत. साबरमती नदीकाठी होत असलेल्या आंतरराष्ट्रीय पतंग महोत्सवातही दोन्ही नेते सहभागी होतील.

**<u>इंधन बैठक</u>**

भारताने 2030 पर्यन्त गैर जीवाश्म इंधनावर आधारित 5 शे गिगावॅट वीज निर्मिती करण्याच आणि 2070 पर्यन्त शून्य कार्बन उत्सर्जनाच लक्ष्य गाठायच उद्दिष्ट समोर ठेवल आहे. अबुधाबी इथ आंतरराष्ट्रीय नवीकरणीय ऊर्जा संघटनेच्या 16 व्या बैठकीत भारताचे ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी ही माहिती दिली. जोशी म्हणाले की भारताचा दृष्टिकोंन वसुधैव कुटुंबकम-एक पृथ्वी - एक परिवार -एक भविष्य हा आहे. तसच समानता, सर्वसमावेशकता आणि नैतिक स्थिरता यावर तो आधारित आहे.

भारताने हवामान बदल विषयक आंतरराष्ट्रीय पॅरिस करारानुसार निर्धारीत वेळेपेक्षा आधीच गैर जीवाश्म ऊर्जा निर्मितीच 50 टक्के लक्ष्य पूर्ण केल आहे. भारतात सध्या 266 गिगा वॅट नवी करणीय ऊर्जा निर्मिती करण्यात येत आहे यामुळे भारताचा समावेश जगातील निवडक आघाडीच्या देशांमध्ये झाला असल्याच ही प्रल्हाद जोशी यांनी यावेळी सांगितल.

**वैष्णव**

अमेरिकेतल्या वॉशिंग्टन इथ होणाऱ्या जी 7 देशांच्या खनिज मंत्र्यांच्या परिषदेत भारताचे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव सहभागी होणार आहेत. या संदर्भात समाजमाध्यमावर प्रसिद्ध केलेल्या संदेशात म्हंटल आहे की या बैठकीचा उद्देश धोरणात्मक भागीदारीनुसार खनिज पुरवठ्याची जागतिक साखळी सुरक्षित करण हा आहे. विकसित भारताच स्वप्न साकार करण्यासाठी महत्वपूर्ण खनिजांची सुरक्षित पुरवठा साखळी अबाधित राहण आवश्यक आहे. यामध्ये तांबे, लिथियम, कोबाल्ट, ग्रेफाइट आणि दुर्मिळ खनिजांचा समावेश आहे.

**अमित शहा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार भारताला एक आत्मविश्वासपूर्ण, महत्त्वाकांक्षी आणि स्वावलंबी राष्ट्र बनवण्याचं स्वप्न पाहत आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी प्रत्येक राज्यानं आपल्या पूर्ण क्षमतेचा उपयोग करणं आवश्यक आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं. केरळात तिरुवनंतपुरम इथ, 'न्यू इंडिया, न्यू केरळ' या परिषदेचं काल उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. शहा यांनी यावेळी केरळच्या आयुर्वेद, माहिती तंत्रज्ञान, पर्यटन आणि क्रीडा क्षेत्रातील कामगिरीचं कौतुक केलं. या दौऱ्यात त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नवनिर्वाचित प्रतिनिधींची भेट घेऊन चर्चा केली.

**इस्त्रो**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात ईस्त्रो आज सकाळी 10 वाजून 17 मिनिटांनी श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून पी एस एल व्ही सी- 62 ई ओ एस एस - वन हे यान, उपग्रह समुहाच प्रक्षेपण करणार आहे. ही भारताच्या यशस्वी पी एस एल व्ही उपग्रह मोहिमेची 64 वी आवृत्ती आहे तसच भारताच्या व्यावसायिक उपग्रह प्रक्षेपण मोहिमेची 9 वी आवृत्ती आहे. या मोहिमेच संचालन न्यू स्पेस इंडिया लिमिटेड ही कंपनी करत आहे. या यानाद्वारे पृथ्वीच्या वातावरणाचा अभ्यास करण्यासाठी एका भारतीय उपग्रहासहित जगातल्या विविध देशांचे 15 उपग्रह प्रक्षेपित करण्यात येणार आहेत.

**प्रगती**

कार्यक्षम प्रशासन आणि नियोजित वेळेत अंमलबजावणीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार स्थापन करण्यात आलेल्या 'प्रगती' या मंचानं 50 बैठकांचा एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. प्रगती मंचाअंतर्गत सातत्यपूर्ण आढावा घेतल्याने नागपूरमधील एम्स संस्था नियोजित वेळेत उभारण्यात आली, अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून.....

**2015 मध्ये सुरुवात झाल्यापासून प्रगती मंचानं आत्तापर्यंत प्रमुख पायाभूत प्रकल्पांचा आणि नागरिकांच्या तक्रारींचा थेट पंतप्रधानस्तरीय आढावा घेऊन प्रशासनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. आरोग्य मंत्रालयानं नागपूरमध्ये अखिल भारतीय वैद्यकीय विज्ञान संस्था म्हणजे एम्स या प्रकल्पाची सुरुवात 7 ऑक्टोबर 2015 रोजी केली. 30 ऑगस्ट 2017 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी PRAGATI अंतर्गत या प्रकल्पाचा आढावा घेतला. अंमलबजावणीदरम्यान मलनिस्सारण व्यवस्थेच्या स्थलांतराशी संबंधित काही अडचणी निर्माण झाल्या होत्या; मात्र विविध यंत्रणांमधील समन्वयातून त्या यशस्वीरीत्या सोडवण्यात आल्या. सतत निरीक्षण, प्रभावी पाठपुरावा आणि वेळेत निर्णय घेतल्यामुळे हा प्रकल्प 30 डिसेंबर 2021 रोजी पूर्ण झाला. आज ही संस्था विदर्भातील लाखो नागरिकांसाठी दर्जेदार आणि आधुनिक वैद्यकीय सेवा देत आहे.**

**महाराष्ट्र प्रचार**

राज्यातल्या 29 महानगरपालिकांचा प्रचार संपण्यासाठी आता फक्त दोन दिवस राहिले आहेत. त्यामुळे कालरविवारच्या सुटीची पर्वणी साधत सर्वच पक्षांच्या प्रामुखी नेत्यांनी राज्यभर झंजावाती प्रचार केला. पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या

पार्श्वभूमीवर आयोजित 'संवाद पुणेकरांशी' या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्याच्या विकासाचा आराखडा मांडला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पिंपरी चिंचवड महापलिकेसाठी दोन्ही राष्ट्रवादी पक्षांचा जाहीरनामा काल प्रकाशित केला. मुंबई महापालिका निवडणूकीसाठी काल महायुतीचा वचननामा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत प्रकाशित करण्यात आला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी काल मुंबईत शिवाजी पार्क इथं संयुक्त जाहीर सभा घेऊन सत्ताधारी भाजपावर जोरदार टीका केली.

**क्रिकेट**

भारतीय क्रिकेट संघाने नवीन वर्षातल्या आपल्या पहिल्या मालिकेची सुरुवात विजयाने केली. न्यूझीलंडविरुद्ध काल झालेल्या मर्यादित षटकांच्या पहिल्या सामन्यात पाहुण्या संघानं दिलेलं 301 धावांचं लक्ष्य भारताने 4 गडी राखून पार केलं. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे. 93 धावांची खेळी करणाऱ्या विराट कोहलीला सामनावीर घोषित करण्यात आलं. कर्णधार शुभमन गिलने 56 तर श्रेयस अय्यरने 49 धावा केल्या. भारताकडून मोहम्मद सिराज, हर्षित राणा आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी 2 तर कुलदीप यादवने एक बळी घेतला.

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.